Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357 Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2504I03S03V13P0003

e-ISSN No. 2394-8426
Dr. Babasaheb Ambedkar's Global Vision 2025
Issue–III(III), Volume–XIII

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय लोकशाही

प्रा. डॉ. राजेंद्रप्रसाद टी. पटले
राज्यषास्त्र विभाग प्रमुख
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय,
पेट्रोल पंप, जवाहरनगर, भंडारा.
मो. न.9422343684

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या महापरिनिर्वाणाच्या अगोदर दोन वर्शे आपल्या अनुयायांना उद्देषून केलेल्या भाशणात त्यांचा संघर्श संपत्ती वा सत्तेसाठी नसून स्वातंत्र्य व मानवी कल्याणासाठी असल्याचे प्रतिपादन केले होते. ते म्हणतात, Ours is a battle not for wealth or for powers. It is a battle for freedom. It is a battle for the reclamation of human personality. यावरून त्यांची केवळ भारतीयांविशयीच नव्हे तर अखिल मानवजातीविशयीची कळकळ लक्षात येते. त्यांना मानव कल्याणासाठी स्वातंत्र्य आणि असे स्वातंत्र्य, की जे मानव कल्याण करेल असे हवे होते. त्यासाठीच त्यांचा संघर्श होता. धर्म व जातीय भेदभावावर आधारलेले स्वातंत्र्य व त्यासाठी स्वीकारलेली लोकषाही प्रणाली चिरकाल टिकणार नाही, याची त्यांना जाणीव होती, म्हणूनच त्यांनी भारतीय समाजातील अस्पृष्यतेची व जातीयतेची कीड नश्ट करण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनातून उपजलेला नव्हता तर भोवतालच्या सामाजिक राजकीय वास्तवाच्या मुशीतून तो तावून सुलाखून निघाला होता. भारतात लोकशाहीची उभारणी करणे एवढयापुरते त्यांचे राजकीय ध्येय परिमित नव्हते. तर जिथे जिथे लोकशाही असेल त्या सर्वच राष्ट्रांशी सहकार्य करून भारताने लोकशाही मुल्यांचे संरक्षण करावे अशीही त्यांची इच्छा होती. सामान्य माणसावर आंबेडकरांचा एवढा लोभ आणि विश्वासही होता. की त्यांच्या व्यक्तिगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापणेसाठी लोकशाही जिवनमार्गाचा त्यांनी ध्यास घेतला होता. 'लोकशाही म्हणजे सहजीवन लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधातच आढळतात अशी त्यांची धारणा होती.

समाजाच्या उन्नत्तीसाठी लोकषाही स्वीकारली तरच घटनेचे पावित्र्य राखले जाईल असे बाबासाहेबांचे मत होते, म्हणूनच त्यांनी भारताच्या राजकीय क्षेत्रात लोकषाही व लोकांचे सार्वभौमत्व रुजविण्यात यष मिळविले. संसदीय लोकषाही व्यवस्था ही सिमीत षासनाचा आदर्ष असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी संसदीय लोकषाहीचे समर्थन केले. लोकषाहीद्वारेच व्यक्ती आत्मनिर्भर बनून जबाबदारी पेलण्यास समर्थ बनू षकतो, असे त्यांचे मत होते. लोकषाही व्यक्तीच्या अंगी उच्च चारित्र्य, षील, सचोटी, सत्याचा विकास घडवून आणते. हिंसा न करता सर्वांगीण उन्नती करण्याची क्षमता केवळ लोकषाहीमध्येच असल्याचे त्यांचे ठाम मत होते.

लोकषाहीमध्ये सर्व लोकांनी ऐक्याने राहणे अपेक्षित असते. जेथे लोकांच्या सांस्कृतिक दृश्टिकोनात तफावत असते तेथे लोकषाही भावना रुजणे अवघड असते. हा विचार आंबेडकरांच्या लोकषाही विचारांमधील प्रमुख विचार आहे. भारतीय लोकषाहीमध्ये जातीजातीमधील भिन्नता, निरक्षरता व दारिद्रय हे प्रमुख अडथळे आहेत. ते जोपर्यंत नश्ट होत नाहीत तोपर्यंत भारतात खऱ्या अर्थाने लोकषाही अस्तित्वात येऊ षकणार नाही.

प्रत्येक देषात एक सत्ताधारी वर्ग असतो, त्याच्याच हाती सत्ता जाणे स्वाभाविक असले तरी ते लोकषाहीषी विसंगत आहे. परंतु आंबेडकरांच्या मते समाजातील सर्वात खालच्या स्तरावर असणाऱ्या वर्गाला जेव्हा सत्ता मिळेल तेव्हाच ती खरी लोकषाही असेल त्यासाठी त्यांनी प्रौढ मताधिकाराचा पुरस्कार केला आहे. खालच्या वर्गाला जर मोफत व योग्य षिक्षण दिले तरच ते लोकषाहीचा स्वीकार करु षकतील. त्यांना वैयक्तिक जीवनात स्वास्थ व षांत जीवनाची हमी हवी तरच लोकषाही यषस्वी होऊ षकेल.

लोकषाहीमध्ये सर्व लोकांनी ऐक्याने राहणे अपेक्षित असते. जेथे लोकांच्या सांस्कृतिक दृश्टिकोनात तफावत असते तेथे लोकषाही भावना रुजणे अवघड असते. हा विचार आंबेडकरांच्या लोकषाही विचारांमधील प्रमुख विचार आहे. भारतीय लोकषाहीमध्ये जातीजातीमधील भिन्नता, निरक्षरता व दारिद्र्य हे प्रमुख अडथळे आहेत. ते जोपर्यंत नश्ट होत नाहीत तोपर्यंत भारतात खऱ्या अर्थाने लोकषाही अस्तित्वात येऊ षकणार नाही. भारतातील सामाजिक—आर्थिक विषमता आणि भेदाभेद लोकशाहीला मारक ठरतील याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. लोकशाहीच्या विषयावर केलेल्या भाषणात ते म्हणाले होते की, ''लोकशाही यशस्वी रितीने चालवायची असेल तर पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे समाजरचनेत कडक बंधने नसावीत ढळढळीत सामाजिक असमानता असू नये. समाजात भरडले जाणारे वर्ग असू नयेत. कारण त्या वृत्ती लोकशाही तत्वाशी विसंगत असतात. सरकार कुठे चूकत आहे हे दाखविण्यासाठी एक विरोधी पक्ष असला पाहिजे न्यायालयापुढे आणि राज्यव्यवस्थेमध्ये व्यक्तीची समानता पाळली पाहिजे. घटनेने घालून दिलेल्या निතितत्वांचे पालन केले पाहिजे. आणि सर्वात महत्वाचे तत्व म्हणजे सार्वजनिक सद्सद्विवेदबुद्धी जागृत असली पाहिजे.

थोडक्यात लोकशाही केवळ तत्वज्ञान म्हणून असू नये, तर समाजजीवनात तिचा अविष्कार झाला पाहिजे अशी तळमळ डॉ. आंबेडकरांना होती. लोकशाहीनिष्ठ समाज निर्माण होण्यासाठी आपण काय केले पाहिजे याची जाणिव त्यांना घटना परिषदेतील समारोपाच्या भाषणात केली आहे. ते म्हणतात '' आपल्याला निव्वळ रूपातच नव्हे तर वास्तवातही लोकशाही हवी असेल तर आपण घटनात्मक मार्गाचाच कटाक्षाने अवलंब केला पाहिजे. त्यांनी भारतीय लोकांच्या व्यक्तीपूजक वृत्तीला विरोध केला व ती वृत्ती लोकशाहीला घातक असल्याचे सांगितले. ते असेही म्हणाले, की आपण राजकीय लोकशाहीवर संतुष्ठ न राहता, राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर करण्यावर भर दिला पाहिजे. लोकशाही दृढमूल होण्याच्या दृष्टिने सर्वसामान्य माणसाचा सनदशीर मार्गावर विश्वास असने आवश्यक असते

थोडक्यात डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणांनाही महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. अधिकारांचा लाभ समाजातील अधिकाधिक लोकांना प्राप्त होणे हा डॉ. आंबेडकरांच्या मते, लोशाहीचा सर्वश्रेष्ठ निकष आहे.

डॉ. आंबेडकरांचा सांसदीय लोकशाहीवर विशेष भर होता. त्यांच्या मते, सांसदीय लोकशाही हीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारी ची जाणीव निर्माण करू शकते. उच्च प्रतिचे राष्ट्रीय चारित्र्य घडून शील, सचोटी, उद्यम व धारिष्टये इत्यांदीचा विकास याच पद्धतीमुळे होऊ शकतो. कारण रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभुत स्वरूपाचे बदल घडवून आणण्याचा मुलमंत्र फक्त संसदीय लोकशाहीलाच अवगत असल्यामुळेच तीच भारतीय समाजहीताच्या दृष्टिने महत्वपूर्ण अशी शासनपद्धती आहे. नियंत्रित प्रतिनिधिकक निवडणूका मूक्त व न्याय्य निवडणूका हा सांसदीय लोकशाहीचा कणा होय असे ते म्हणत.कायदयाला लोकशाहीत अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

त्यांच्यामते, लोकशाहीच्या विकासासाठी निकोप, संघटित, शिस्तबद्ध राजकीय पक्षाची नितांत आवश्यकता असते. राजकीय पक्षांखेरीज लोकशाहीची कल्पनाच करणे व्यर्थ आहे. भारतीय लोकशाही बलवान झाल्याशिवाय भारतीय समाज आणि राष्ट्र बलशाली होणार नाही हा विचार त्यांनी सातत्याने मांडला. एक व्यक्ती एक मुल्य हे सुत्र त्यांनी आमच्या हाती दिले. कुठल्याही लोकशाही व्यवस्थेमध्ये मौलिक अधिकार जरी प्रदान केले असले तरी त्या मौलिक अधिकारांचा उपयोग करण्याची क्षमता जर नागरीकांमध्ये नसेल तर मौलिक अधिकार व्यर्थ ठरतात. थोडक्यात स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय या तत्वावर आधारलेल्या शोषणापूान मुक्त, व्यक्तिच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणारा आणि नैतिक मुल्यांची बुज राखणारा समाज घडविणे म्हणजे लोकशाहीची खरी प्रस्थापना होय असा डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोण होता

.बबासाहेबांचे आर्थिक सामाजिक विचार प्रासंगिक असून त्याला भगवान बुद्धाची जोड आहे त्यास्तव बौध्द जगतात शांती सुव्यवस्था असून आर्थिक शोषण फारच कमी आहे. भगवान बुध्द फार मोठे अर्थशास्त्रज्ञ होते व त्यांनी आपल्या संघात समाजवाद निर्माण केला होता. त्याचे उदाहरण बाबासाहेबांनी भारतीय राज्य घटना देतांना त्याचा उल्लेख केला होता व सामाजिक आर्थिक दरी निर्माण न होता प्रत्येकांचा विकास कसा होईल यावर भर देऊन स्टेट साशॉलिज्म ही कल्पना ठेवून आपले आर्थिक विचार जगासमोर मांडले आहेत.रक्तपाताशिवाय अहिंसेच्या व शांततेच्या मार्गाने घडून आलेली क्रांती लोकशाही होय असे ते म्हणतात

**सांसदीय लोशाहीतील अडथळे** :

लोकशाही स्वीकारल्यानंतर तिच्या यशस्वीतेत पुढील अडथळे येऊ शकतील हयाची त्यांना जाणीव होती. त्यांच्या मते हे संभाव्य अडथळे पुढीलप्रमाणे आहेत.

**षांततेच्या मार्गाने सत्ताबद्दल** — जनतेला राज्यकर्त्यांना सत्तेपासून दूर करावयाचे असेल तर षांततेच्या मार्गाने ते करू षकतात. कोणत्याही प्रकारची हिंसा किंवा रक्तपात करण्याची गरज पडत नाही. मुदतीपूर्वी प्रधानमंत्री किंवा त्याच्या मंत्रिमंडळाला सत्तेपासून दूर करता येते.

**आर्थिक आणि सामाजिक विषमता** : ज्या देशात सांसदीय शासनपद्धती अपयशी झाली आणि त्यामुळे त्यांना ती समाप्त करावी लागली. याचे मुख्य कारण आर्थिक आणि सामाजिक समानता आणण्यास ही पद्धती अपयशी ठरली. डॉ. आंबेडकरांनी याच कारणामुळे आर्थिक आणि सामाजिक लोकशाही निर्माण करण्यावर भर दिला होता.

**निरक्षता** : देशातील एकूण लोकसंख्येच्या मानाने निरक्षर लोकांचे प्रमाण फार जास्त आहे. लोक अशिक्षित असले तर ते चांगले—वाईट, योग्य—अयोग्य, न्याय—अन्याय हयातील भेद समजू शकत नाहीत.

**जातीय स्वरूपाचे राजकारण** : भारतीय समाज जातीवर आधारलेला आहे. जातीय व्यवस्थेची पालेमुळे खोलवर रूजलेली आहेत. ही परिस्थिती सांसदीय लोकशाहीला पोषक नाही.

**अल्पसंख्यांकांचा प्रश्न** : संसदेत जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे संसदेतील बहुमत हे जातीय स्वरूपाचे राहील. अशी त्यांना शंका होती. त्यामुळे अल्पसंख्यांकावर अन्याय होण्याची त्यांना भीती होती.

**विरोधी पक्षांना दडपून टाकण्याची वृत्ती** : लोकशाही यशस्वी होण्यासाठी विरोधी पक्ष मजबुत असला पाहिजे. विरोधी विचार दडपून टाकणे लोकशाहीला घातक आहे.

**विभूतीपुजेबाबत टीका** : भारतीयांमध्ये व्यक्तीपुजेची वृत्ती मुळातच भिनलेली आहे. — विभूतीपुजेमुळे अनुयायी आपले स्वत्व गमावतात. आपले स्वातंत्र्य आपल्या नेत्याला बहाल करतात.

त्यातून नेता हुकूमषाही प्रवृत्तीचा वापर करू षकतो. प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्याच्या विचारांबाबत आदर असला पाहिजे, परंतु त्यांनी दुसऱ्या कोणाला देवत्व देऊ नये असे आंबेडकरांचे स्पश्ट मत होते.

**सारांष :—**

आज जागतिक पातळीवर भारताचा मानव विकास निर्देषांक जगातील १८७ देषांच्या मानव विकास निर्देषांकात भारताचा १३५वा क्रमांक आहे. याचाच अर्थ देषात पराकोटीची विशमता जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कायम आहे, याचे कारण विकासाचा वाढता असमतोल व षासनकर्त्यांचा संविधान अंमलबजावणीप्रती नाकर्तेपणा हे त्याचे मुख्य कारण आहे. यावरुन हे स्पश्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकषाही येथे रुजवता आली नाही.

डॉ. आंबेडकरांचे या संदर्भातील विधान अत्यंत महत्वाचे दिसतात. ते म्हणतात लोकांनी १९४९ च्या नोव्हेंबर मध्ये स्वत:साठी केलेली राज्यघटना पूढे कधीकाळी समाधानकारक वाटेनाशी झाली तर राज्यघटना अयशस्वी ठरली असे न मानता ती राज्यघटना राबविणारा माणूस अधम निघाला असेच म्हणावे लागेल. ते ऐके ठिकानी असेही म्हणतात की, 'जर लोकशाही टिकली तर तिची फळे आम्हाला कधी ना कधी चाखायला मिळणार आहेत. पण लोकशाही संपली तर आपले मरणच ठरेल. याबाबत कोणतीही शंका नको' लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी लोकशिक्षण आणि लोकजागृतीतून चारित्र्य संपन्न जनप्रतिनिधींच्या हाती भारतीय लोकशाहीचे नेतृत्व देणे गरजेचे आहे. देषातील सर्व व्यवहार संविधानाबरहुकूम व्हावेत. देषातील सामान्य व्यक्ती असो अथवा एखादा थोर नेता, कोणीही घटनाबाह्य वर्तन करता कामा नये.

**संदर्भ ग्रंथ :**

1. Author – Rajkumar - Economic Thought of Dr. B. R. Ambedkar Published Commonwealth Publisher Pvt. Ltd. - 2011.
2. Dr. B. R. Ambedkar , Dr. Shiv Gajrani & Dr. S. Ram Commonwealth Publication 2012.
३ भोळे, भा. ल. पिंपळापुरे प्रकाशन नागपूर — आधुनिक भारतातील राजकीय विचार
४ डॉ. गंगाधर पानतावने (संपादक) प्रतिभा प्रकाशन — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडकलेख
५ प्रा. रेखा पळषीकर, प्रा. षैलेंद्र दवळाणकर — स्वतंत्र भारतातील राजकीय विचार प्रवाह